**असुधारित प्रत**

# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक १४ डिसेंबर, २०१६
## (सकाळी ११.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

(अ) तारांकित प्रश्न.

(ब) अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक २०१ ते २२० सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

(क) तारांकित प्रश्नांबाबतची अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री** : (१) "ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, मुरबाड व शहापूर तालुक्यातील पाणी टंचाईबाबत" या विषयावरील श्री. किसन कथोरे व इतर वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ३१२९२ ला दिनांक १७ डिसेंबर, २०१५ रोजी दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

(२) "खारेपाट (ता.पेण, जि.रायगड) विभागातील गावे व वाडीवस्त्यांवरील पाणी टंचाईबाबत" या विषयावरील श्री. मनोहर भोईर व इतर वि.स.स. यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ४०३४६ ला दिनांक ११ मार्च, २०१६ रोजी दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने अनुपूरक प्रश्नोत्तरांच्या वेळी दिलेल्या आश्वासनानुसार अधिक माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवतील.

**दोन : शोक प्रस्ताव -**

डॉ. रमेश यशवंत प्रभु, सर्वश्री राजाराम केशव शिंदे, चंदनसिंह बाबनसिंह सद्दीवाल, माजी वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

**तीन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** : श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(२) वित्त व नियोजन, वने मंत्री** :

(क) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **वित्त विभागाची** सन २०१०-२०११ या वित्तीय वर्षाची योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय तरतूद व प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र जैविक विविधता (सुधारणा) नियम, २०१६ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक डब्लूएलपी.१००४/प्र.क्र.२२६/फ-१ दिनांकित २० ऑक्टोबर, २०१६ सभागृहासमोर ठेवतील.

**(३) उद्योग मंत्री** :

(क) मराठवाडा विकास महामंडळ मर्यादित, औरंगाबाद यांचा सन २०१४-२०१५ या वर्षाचा अठ्ठेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(ख) विदर्भ विकास महामंडळ मर्यादित, नागपूर यांचा सन २०१४-२०१५ व २०१५-२०१६ या वर्षांचा अनुक्रमे चव्वेचाळीसावा व पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

**(४) वस्त्रोद्योग मंत्री** : महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ मर्यादित नागपूर यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा पंचेचाळीसावा वार्षिक अहवाल आणि वित्तीय पत्रके सभागृहासमोर ठेवतील.

**चार : सार्वजनिक उपक्रम समितीचा अकरावा अहवाल सादर करणे.**

**पाच : औचित्याचे मुद्दे.**

**सहा : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :**

(१) **सर्वश्री.सुनिल प्रभु, अतुल भातखळकर, प्रशांत ठाकूर, विलासराव जगताप, डॉ. मिलिंद माने, सर्वश्री. संजय पुराम, राजू तोडसाम, डी. मल्लिकार्जून रेड्डी, डॉ. देवराव होळी, डॉ. अशोक उईके, सर्वश्री. शरद सोनवणे, सरदार तारासिंह, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आदिवासी विकास मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"जळगाव जिल्हयातील काही अनुदानित निवासी आश्रम शाळांनी हजेरीपटावर सुमारे ८ हजार बनावट विद्यार्थी कागदोपत्री दाखवून कोटयवधी रुपयाचा आर्थिक गैरव्यवहार केल्याचे नुकतेच उघडकीस येणे, आधार कार्डच्या नोंदणीसाठी राबविलेल्या मोहिमेद्वारे सदर बाब उघड होणे, हजेरीपटावर दाखविण्यात आलेले अनेक विद्यार्थी परराज्यातील असणे, शासकीय अनुदान प्राप्त ५५९ शाळांमधील २.४ लाख विद्यार्थांपैकी ४० टक्के विद्यार्थांची नावे बनावट असल्याचे प्राथमिक सर्वेक्षणाच्या निष्कर्षातून स्पष्ट होणे, यामुळे सुमारे ६८ कोटीहून अधिक रक्कमेचे शासनाचे झालेले नुकसान, तसा अहवाल जिल्हाधिकारी, जळगाव यांनी सादर करुनही शासनाने अद्याप संबंधीत अधिकारी व संस्थाचालक यांच्याविरुध्द कोणतीही कारवाई न करणे, तसेच उमरी (जि.वाशिम) येथील आश्रमशाळेमध्येही केवळ १५ ते २० मुले व १२ मुली असतांना आश्रमशाळेची विद्यार्थी पटसंख्या अनुक्रमे १७७ व १४० अशी बनावट असल्याचे निदर्शनास येणे, शासन दरवर्षी अनुदानित निवासी आश्रमशाळांवर ३२५ कोटीहून अधिक रक्कम खर्च करीत असूनही त्याचा विद्यार्थांना लाभ न होणे, सदर प्रकरणाची शासनाने उच्च स्तरावरुन चौकशी करुन दोषींविरुध्द तात्काळ कारवाई करण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे झालेले दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **श्री.तान्हाजी मुटकुळे, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे जलसंपदा मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"हिंगोली जिल्ह्याचा सिंचन अनुशेष वेगळा करण्याबाबत मा.राज्यपाल महोदयांनी बैठक घेतली असणे, सदर बैठकीमध्ये मा.राज्यपाल महोदयांनी परभणी जिल्ह्यातून वेगळा झालेल्या हिंगोली जिल्ह्याचा सिंचन अनुशेष वेगळा करण्याचे दिलेले निर्देश, याच विषयासंदर्भात शासनाने दिनांक १८ जुलै, २०१६ व दिनांक ७ नोव्हेंबर, २०१६ रोजी घेतलेल्या बैठकीमध्ये सर्व संबंधीत विभागामार्फत तातडीने अहवाल मागविणे, परभणी

जिल्ह्यातून हिंगोली जिल्ह्याचा सिंचन अनुशेष वेगळा करण्याबाबत सर्व हिंगोली जिल्ह्यातील जनतेची असलेली मागणी, सन १९९१ मध्ये परभणी जिल्ह्याचे विभाजन होऊन नवीन हिंगोली जिल्ह्याला १६ वर्षे झालेली असून अद्याप हिंगोली जिल्ह्याचा सिंचन अनुशेष मंजूर झालेला नसणे, सदर सिंचन अनुशेष वेगळा करण्याबाबतचा परिपुर्ण प्रस्ताव मंजूरीसाठी शासन स्तरावर प्रलंबित असणे, हा अनुशेष तातडीने वेगळा करण्याची नितांत गरज असून याकरीता शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री.राधाकृष्ण विखे-पाटील, विजय वडेट्टीवार, अब्दुल सत्तार, अमित देशमुख, अमर काळे, सुनिल केदार, ॲड. राहुल कुल, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे कृषी मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"पंतप्रधान पीक विमा योजनेच्या माध्यमातून नुकसान भरपाई मिळण्यास शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास येणे, नुकसान झाल्यानंतर ४८ तासांच्या आत विमा कंपनीला त्याबाबतची माहिती देण्याचे टाकलेले बंधन, टोल फ्री नंबरवर दिली जाणारी अपूर्ण माहिती व करण्यात येणारी दिशाभूल, काही ठिकाणी तर पंचनामे वेळेत न झाल्याच्या कारणास्तव नाकारण्यात आलेली नुकसान भरपाई, प्रत्यक्षात झालेले नुकसान उपग्रहाद्वारे मॅपिंग व ड्रोन वापरुन निश्चित करण्याचे दिलेले आश्वासन, योजनेची अंमलबजावणी होण्याअगोदर निधीचा होत असलेला अपहार, शासन व विमा कंपनी यांनी कोणत्याही सबबी न सांगता शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची आवश्यकता याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री. जयंत पाटील, अजित पवार, दिलीप वळसे-पाटील, भास्कर जाधव, शशिकांत शिंदे, सुरेश लाड, जितेंद्र आव्हाड, वैभव पिचड, जयदत्त क्षीरसागर, श्रीमती दिपीका चव्हाण, वि.स.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे रोजगार हमी योजना मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-**

"खडीमाला (ता. चिखलदरा, जि. अमरावती) या गावातील सुमारे ४५० आदिवासींचे वेतन तेथील ग्रामसेवकाने हडप केल्याची गंभीर बाब उघडकीस येणे, रोजगार हमी योजनेच्या कामावर आदिवासी लोकांना शेतातील खोदकामाचे काम देण्यात येणे, सुमारे ८ महिने काम करुनसुध्दा ग्रामसेवकाने त्यांच्या मजुरांची रक्कम त्यांना न देता स्वत: हडप केलेली असणे, याशिवाय इतर गावातील १५० मजूरांची देखील मजूरी याच ग्रामसेवकाने हडप केलेली असणे, उप विभागीय अधिकारी यांनी यासंदर्भात चौकशी करुनसूध्दा

संबंधितांविरुध्द कोणतीही कारवाई न होणे, आदिवासींना त्यांच्या मजूरीचे पैसे अद्यापही देण्यात न येणे, त्यामुळे त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष, आठ महिन्यांची मजूरी न मिळाल्यामुळे आदिवासी मजूरांवर ओढावलेली उपासमारीची परिस्थीती, यासंदर्भात संबंधित आदिवासींना जिल्हाधिकारी, अमरावती यांच्याकडे तक्रारी करुनसूध्दा त्यावर कोणताही निर्णय घेण्यात न येणे, आदिवासी मजूरांना त्यांच्या मजूरीची रक्कम त्वरीत मिळणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**सात : सन २०१६-२०१७ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा व मतदान (दुसरा व शेवटचा दिवस).**

(१) कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग.

(२) सार्वजनिक बांधकाम विभाग.

(३) ग्रामविकास व जलसंधारण विभाग.

(४) पर्यावरण विभाग.

(५) सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग.

**(मतास टाकावयाच्या मागण्यांची सूची स्वतंत्रपणे वितरीत केल्याप्रमाणे)**
**[ चर्चारोध (गिलोटीन) सायंकाळी ०५.३० वाजता ]**

**आठ : शासकीय विधेयके :**

**(१) पुर:स्थापनार्थ :-**

(क) सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५५ – महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०१६.

(ख) सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५६ – महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०१६.

---

(२) **विधानसभेने संमत केलेले विधेयक महाराष्ट्र विधानसभा नियमातील नियम १४१(१) अन्वये सभागृहाने पुन्हा संमत करणे :-**

सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ - महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१६.

---

**(३) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-**

(क) **सन २०१६ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५४ – महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१६.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत प्रा.वीरेंद्र जगताप, श्री.हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१६ चे महाराष्ट्र विधानसभा विधेयक क्रमांक ५४ – महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०१६ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(मंगळवार, दिनांक १३ डिसेंबर, २०१६ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)**

**नऊ : श्री. सुनिल प्रभु, डॉ. अनिल बोंडे, श्री. सदा सरवणकर, डॉ. आशिष देशमुख, श्री. सुनिल शिंदे, डॉ. संजय कुटे, डॉ. संजय रायमुलकर, श्री. समीर मेघे, डॉ. शशिकांत खेडेकर, सर्वश्री. राज पुरोहित, सुरेश धानोरकर, अतुल भातखळकर, रमेश लटके, योगेश सागर, मंगेश कुडाळकर, सर्वश्रीमती मनिषा चौधरी, तृप्ती सावंत, ॲड. पराग अळवणी, सर्वश्री. अशोक पाटील, सुधाकर देशमुख, तुकाराम काते, विकास कुंभारे, सुनिल राऊत, राजेंद्र पाटणी, प्रकाश फातर्पेकर, समीर कुणावार, प्रकाश सुर्वे, ॲड. आशिष शेलार, सर्वश्री. संजय पोतनीस, मंगलप्रभात लोढा, डॉ. सुनिल देशमुख, डॉ. मिलिंद माने, सर्वश्री. कृष्णा खोपडे, सुधाकर कोहळे,**

**कॅ. आर. तमिल सेल्वन, सर्वश्री. अमीत साटम, मल्लिकार्जुन रेड्डी, डॉ. पंकज भोयर, सर्वश्री. सुधीर पारवे, चैनसुख संचेती, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"विदर्भातील जलसंपदाचे अपूर्ण प्रकल्प, अनुशेषांतर्गत प्रकल्प, झुडपी जंगलामुळे अडलेले प्रकल्प कार्यान्वित करण्यातील पर्यावरणदृष्टया असलेले अडसर दूर करणे, भूसंपादन व पुनर्वसनाच्या कामाची गती वाढवून पुरेसा निधी उपलब्ध करणे, जलवितरण व लाभक्षेत्र विकास अंतर्गत प्रत्येक महामंडळात स्वतंत्र यंत्रणा निर्माण करणे, कालव्याऐवजी पाईपलाईनने सिंचन करणे, सर्व प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता घेणे, पाणी वापर संस्था, उपसा सिंचन संस्था बळकट करुन शेतकऱ्यांना जलसक्षम करणे, पिण्याचे पाणी, औद्योगिक व कृषी वापराचे पाणी यांचे नियोजन करणे, गोदावरी व तापी खोरे जलनियोजन आराखडा तयार करणे, वैणगंगा व नळगंगा जोडप्रकल्प आणि कन्हान-वर्धा बोगद्याव्दारे नदीजोड प्रकल्पाचा अभ्यास करुन ते तातडीने कार्यान्वित करणे, नागपुरातील मेट्रो रेल्वे व मिहान प्रकल्पाच्या कामातील प्रगती, विदर्भातील नगरपालिकांना हगणदारीमुक्त करणे, भुयारी गटार योजना, भूपृष्ठावरील पेयजल व्यवस्थापन, अंतर्गत रस्ते विकास, खुल्या जागा व विकास क्षेत्रामधील जागा संरक्षित करणे, उद्यान निर्मिती व नदी परिसर यांचा विकास करुन स्मार्ट शहर करण्याकडे शासनाचा असलेला रोख, पंतप्रधान आवास योजना "ब" व "क" वर्ग नगरपालिका क्षेत्रामध्ये कार्यान्वित करणे, वन पर्यटन उद्यान, जंगल सफारी, वन संशोधन, बांबू व वन उत्पादनामधून रोजगार निर्मिती करण्यात शासनाने अग्रेसर राहणे, मुंबईतील उपकरप्राप्त व मोडकळीस आलेल्या इमारतींचा पुनर्विकास जलद गतीने करण्याच्या दृष्टीने प्रशासनिक व तांत्रिक मंजुरीचे निकष सुलभ व शिथिल करण्याची आवश्यकता, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान परिसरातील झोपडपट्टीधारकांचे स्थलांतर करुन तेथील जमिनीचे भूसंपादन व तेथील सर्व्हे नं. २३९ वरील जमिनीची पुनर्मोजणी करण्याबाबत लोकप्रतिनिधी व स्वयंसेवी संस्थांकडून होत असलेली मागणी, आरे वसाहतीतील आदिवासी व पात्र झोपडपट्टीधारकांची समस्या व त्यांचे पुनर्वसन, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही विचारात घेण्यात यावी."

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : १३ डिसेंबर, २०१६

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.